**Details on Website**

**पोलीस महासंचालक कार्यालय, मुंबई**

**पोलीस महासंचालक कार्यालयात सेवा निवृत्त अधिकाऱ्याची करार पध्दतीने नियुक्ती करण्याकरिता नामसूचिका तयार करण्याबाबत**

**१. नामिकासूचीत नियुक्ती करावयाच्या एकूण व्यक्तीची संख्या :- १ (एक)**

२. **विवक्षित कामाचे स्वरुप :-** पोलीस महासंचालक कार्यालयातील रचना व कार्यपध्दतीचे कामकाज पार पाडण्यास सहाय्य करणे, त्यामध्ये सुधारणा करणे, कार्यालयीन कामकाजाचा दर्जा सुधारला जावा याकरिता लिपिक वर्गासाठी कामकाज प्रशिक्षणाच्या कार्यक्रमाचे नियोजन करणे व प्रशिक्षण देणे, तसेच, पोलीस महासंचालक कार्यालयात ई-ऑफीस यंत्रणेची प्रभावीपणे अंमलबजावणी करुन घेणे.

३. **नियुक्तीचा कालावधी :-** १ वर्ष किंवा काम पूर्ण होईपर्यंत यापैकी जे अगोदर घडेल तोपर्यंत.

**४. देय मासिक पारिश्रामिक व भत्ते :-** शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग क्र. संकिर्ण-२७१५/ प्र.क्र.१००/१३, दि.१७.१२.२०१६ मधील ड (१)(क) नुसार देय असलेले मासिक पारिश्रामिक व भत्ते व ड (३) नुसार देय असलेला प्रवासभत्ता व दैनिक भत्ता.

**५. अटी व शर्ती**

१. उमेदवार पोलीस विभागातील वरिष्ठ प्रशासकीय अधिकारी / पोलीस महानिरीक्षक यांचे उपसहायक या पदावरुन सेवानिवृत्त झालेला असावा.

२. उमेदवारास पोलीस कार्यालयातील सेवा विषयक बाबी, रचना व कार्यालयीन कार्यपध्दती / प्रशिक्षण या विषयीचे कामकाजाचा किमान ३ वर्षाचा अनुभव असावा, तसेच तो शारिरीक, मानसिक वा आरोग्याच्या दृष्टीने सक्षम असावा व त्यामध्ये प्रस्तावित सेवेसाठी आवश्यक ती क्षमता असावी.

३. उमेदवाराविरुध्द कोणतेही विभागीय चौकशी चालू किंवा प्रस्तावित नसावी, त्यास कोणतेही शिक्षा झालेली नसावी.

४. उमेदवारास मराठी व इंग्रजी भाषेचे चांगले ज्ञान असावे.

५. उमेदवाराचे वय ६५ वर्षापेक्षा अधिक नसावे.

६. उमेदवार मुंबई शहर अथवा उपनगरातील राहणारा असावा,

७. नियुक्तीच्या कालावधीत करार पध्दतीने विवक्षित काम पूर्ण करण्याची जबाबदारी निवड करण्यात आलेल्या उमेदवाराची असल्याबाबत त्यास शासन निर्णय दि.१७.१२.२०१६ मधील अ (४) Iनुसार बंधपत्र / हमीपत्र देणे बंधनकारक आहे.

८. करार पध्दतीने नियुक्त सेवानिवृत्त अधिका-यास पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांच्या कार्यालयात काम करावे लागेल.

९. कराराच्या कालावधीत सेवानिवृत्त अधिकारी संबंधित विशेष पोलीस महानिरीक्षक (प्रशासन), अपर पोलीस महासंचालक (प्रशासन) यांच्या नियंत्रणाखाली काम करतील व ते त्यांना केलेल्या कामकाजाचा अहवाल दरमहा सादर करतील.

१०. वरील व्यतिरिक्त शासन निर्णय सामान्य प्रशासन विभागाच्या क्र. संकिर्ण २७१५/प्र.क्र.१००/१३, दि.१७.१२.२०१६ निर्णयातील नमूद इतर सर्व अटी व शर्तीही त्यांना लागू राहतील.

६. उपरोक्त प्रमाणे आवश्यक ती अर्हता धारण करणा-या इच्छूक उमेदवाराने त्यांचे अर्ज जाहिरात प्रसिध्द झाल्यापासून ८ दिवसाच्या आत करावेत. या संदर्भात अधिक माहितीसाठी ०२२-२२०२७४५१ या दूरध्वनीवर संपर्क साधावा. विहित कालावधीनंतर प्राप्त झालेल्या अर्जावर कोणतीही कार्यवाही केली जाणार नाही तसेच या संदर्भात केल्या जाणा-या कोणत्याही पत्रव्यवहाराची दखल घेतली जाणार नाही.

७. उपरोक्त प्रमाणे अर्हता व अनुभव नसलेल्या सेवानिवृत्त अधिकारी / कर्मचाऱ्यांनी अर्ज सादर केल्यास अशा अर्जाचा विचार केला जाणार नाही. तसेच अशा अर्जांना कोणतेही उत्तर / प्रतिसाद दिला जाणार नाही.

८. मुलाखतीद्वारे पात्र ठरलेल्या उमेदवारांची नामसूचिका तयार करण्यात येईल. उमेदवार निवडीबाबतचे संपूर्ण अधिकार अपर पोलीस महासंचालक (प्रशासन), महाराष्ट्र राज्य, मुंबई यांना राहतील.

****

## <u>अर्जाचा नमुना</u>

**पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांच्या कार्यालयात “रचना व कार्यपध्दती व लिपिक वर्गासाठी कामकाज प्रशिक्षण सल्लागार” पदी करार पध्दतीने नियुक्ती करण्याकरिता अर्ज**

| उमेदवाराने अलीकडील काळातील स्वत:चे छायाचित्र येथे चिकटवावे. |
|---|

| | | |
|---|---|---|
| १. | अर्जदाराचे संपूर्ण नाव | :- |
| २. | अर्जदाराच्या निवासाचा पत्ता | :- |
| ३. | सेवानिवृत्तीच्या वेळेचे पदनाम | :- |
| ४. | भ्रमणध्वनी क्रमांक | :- |
| ५. | जन्म दिनांक व वय | :- |
| ६. | पदासाठी विहित केलेली अर्हता अर्जदाराकडे आहे काय ? | :- होय / नाही |
| ७. | मराठी व इंग्रजी भाषेचे चांगले ज्ञान आहे का ? | :- होय / नाही |
| ८ | विभागीय चौकशी / शिक्षा चालु किंवा प्रस्तावित आहे का ? | :- होय / नाही |
| ९ | अनुभव / इतर प्राविण्य इत्यादी | :- |

पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांच्या कार्यालयात “रचना व कार्यपध्दती व लिपिक वर्गासाठी कामकाज प्रशिक्षण सल्लागार” पदी करार पध्दतीने नियुक्ती करावयाची जाहिरात व www.mahapolice.gov.in या संकेतस्थळावरील माहिती, सूचना तसेच अटी व शर्ती मी काळजीपूर्वक वाचल्या. सदर अटी व शर्ती मला मान्य आहेत.

ठिकाण :-
दिनांक :-

अर्जदाराची स्वाक्षरी